## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे मोफत होमिओपॅथिक औषधोपचार शिबिराचे आयोजन व दुरस्थ होमिओपॅथिक ओपीडी सेवेचे उद्घाटन......

शनिवार दिनांक 23 सप्टेंबर 2023 रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांच्या वतीने "मोफत होमिओपॅथिक औषधोपचार शिबिर" आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठातील आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक दुरस्थ ओपीडी सेवेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू माननीय प्रो. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.अविनाश महाजन सर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू मा. प्रो. एस. टी. इंगळे सर, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विनोद पाटील सर, शासकीय होमिओपॅथिक रुग्णालयाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश सरताळे, होमिओपॅथिक महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. प्रताप वळसे, डॉ. अजित विसपुते, डॉ. निलेश पाटील व वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज विसपुते उपस्थित होते.

मोफत होमिओपॅथिक औषधोपचार शिबिराचा लाभ विद्यापीठातील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी वर्गाने घेतला. विद्यापीठातील आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालय यांच्यावतीने तज्ञ डॉक्टरांच्या सेवा पुरवण्यात येतील. विद्यापीठातील आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथिक औषधोपचार सेवा सुविधेचा विद्यापीठातील सर्व विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी वर्गाला फार मोठा फायदा होईल असे मत मा. कुलगुरू यांनी मांडले. शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने डॉ. प्रताप वळसे यांनी होमिओपॅथिक औषधोपचारां बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी केले. डॉ. सारंग खाचणे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात होमिओपॅथिक औषधोपचार शिबिर

## शिबिरात ५५ रुग्णांनी घेतला लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात शासकीय होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या सहकार्याने शनिवारी मोफत होमिओपॅथिक औषधोपचार शिबिर घेण्यात आले.

शिबिराचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या उपस्थितीत झाले. दुपारपर्यंत या शिबिराचा ५५ रुग्णांनी फायदा घेतला. शासकीय



महाविद्यालयाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश सरताळे, डॉ. मनोज विसपुते, डॉ. अजित विसपुते, डॉ. नीलेश पाटील, डॉ. प्रताप वळसे यांच्यासह विद्यापीठाचे आरोग्य अधिकारी डॉ. सारंग खाचणे, डॉ. साजिया शेख आणि आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

Jalgaon Main
Page No. 2 Sep 25, 2023
Powered by: erelego.com


प्रतिक्षा कक्ष
शांतता राखा
Health Center
Emergency Contact. No.
0257/2257400
बहिणाबाई चौधरी
विद्यापीठ, जळगाव
आणि
शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
शिबिर'


प्रतिक्षा कक्ष
शांतता राखा
Health Center
Emergency Contact. No.
0257/2257400
Ambulance Contact No.
0257/2257245/246
बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
आणि
शासकीय होमिओपॅथिक महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
'मोफत होमिओपॅथिक औषधोपचार


शासकीय होमिओपॅथी वैद्यकीय


शांतता राखा
Health Center




वैद्यकीय
जळगांव
D-Link




शासन
वैद्यकीय